| **Headline:** Children 'take over' NSE Ring closing bell | |
|---|---|
| **Source:** Regionals | **Date:** 15 November 2017 |

**Maharashtra Times**




**अर्थनादही अमुच्या हाती...**

युनिसेफ संघटनेच्या सहकार्याने ३५ मुलांच्या चमूने मंगळवारी बालदिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय शेअर बाजाराला भेट दिली. बाजार बंद होतानाचा घंटानाद या मुलांनी केला. राष्ट्रीय शेअर बाजाराचे एमडी व सीईओ विक्रम लिमये यावेळी उपस्थित होते.

**Loksatta**

# बालहक्कांसाठी 'एनएसई'त संवाद

**प्रतिनिधी, मुंबई**

**बालहक्क म्हणजे** काय ते इथपासून ते विविध कंपन्यांनी बालहक्क जपण्यासाठी कशा रीतीने पुढाकार घ्यावा, याविषयी बालदिनी 'नॅशनल स्टॉक एक्स्चेंज'च्या (एनएसई) इमारतीत रंगली. बालकांनी सूत्रसंचालन केलेल्या या चर्चेत एनएसईच्या 'स्ट्रॅटेजिक बिझनेस' विभागाच्या प्रमुख सुझान मिस्त्री, 'युनिसेफ इंडिया'च्या हेन्रिथ अहन्स, कॅपजेमिनी कंपनीच्या सीएसआर विभागाचे प्रमुख कुमार अनुराग प्रताप या मान्यवरांसह 'प्रत्येक' या सामाजिक संस्थेतील दहावीत शिकणारी गुलबक्षा आणि अहमदनगर येथील आदिवासी आश्रमशाळेत शिकणारा राज्यपातळीवरील खेळाडू प्रसाद माळी आदी सहभागी झाले होते. 'नॅशनल स्टॉक एक्स्चेंज' व 'युनिसेफ'ने हा कार्यक्रम आयोजित केला होता.

सामाजिक बांधिलकी म्हणून हाती घेतलेल्या उपक्रमांमधील जवळपास सात सामाजिक संस्था आणि बालके यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाला आरंभ झाला. 'प्रत्येक' या सामाजिक संस्थेच्या 'नाइन इज माइन' या उपक्रमांतर्गत उच्चभ्रू घरातील मुलांना मिळणाऱ्या शैक्षणिक सुविधांच्या तुलनेत दुर्बल कुटुंबातील मुलांचा हिरावला जाणारा शैक्षणिक हक्क याचे सादरीकरण करणारी नाटिका मुलांनी सादर केली. देशाच्या राष्ट्रीय सकल उत्पन्नापैकी नऊ टक्के खर्च हा आरोग्य आणि शिक्षण यावर करायला हवा, हे या माध्यमातून मुलांनी मांडले. या चर्चासत्रात दुर्बल घटकातील मुलांना भविष्याबाबत पडणारे प्रश्न, सामाजिक बांधिलकीअंतर्गत हाती घेतलेल्या कार्यक्रमात बालकांच्या समस्यांना दिले जाणारे प्राधान्य आणि कंपन्यांकडून तयार केली जाणारी उत्पादने बालकांसाठी कशा रीतीने पूरक असावीत, असे मुद्दे मांडले गेले. मुलांच्या शैक्षणिक आणि आरोग्याच्या विकासावर भर देणे गरजेचे आहे. केवळ पाठ्यपुस्तकी शिक्षण देऊन साक्षर करणे हा उद्देश नसून सुजाण नागरिक म्हणून त्यांना घडविणे यासाठी एनएसई गेली अनेक वर्षे विविध उपक्रम राबवीत आहे, असे सुझान मिस्त्री यांनी सांगितले. एनएसईची भली मोठी इमारत पाहून थक्क वाटले. इथल्या मान्यवरांसोबत मोठ्या व्यासपीठावर बसण्याची मला संधी मिळाली. व्यासपीठावरून कसे बोलावेच हेच समजत नव्हते. परंतु इथल्या मोकळ्या वातावरणामुळे नंतर मराठीतून बोलायला लागलो, असे प्रसाद माळी याने सांगितले.



**Navbharat Times**



बाल दिवस के अवसर पर विश्व के सबसे कमोजर वर्ग के बच्चों के अधिकारों की सुरक्षा के लिए 35 एनजीओ के बच्चों ने नैशनल स्टॉक एक्सचेंज के मंच पर आवाज उठाई, साथ ही कॉर्पोरेट जगत से उनकी शिक्षा और भविष्य के लिए सहायता करने का आग्रह किया। इस अवसर पर एनएसई के एमडी एवं सीईओ विक्रम लिमये ने बच्चों के साथ मिलकर क्लोजिंग बेल बजाई ।

**Sakal**




मुंबई : बाल हक्कांच्या संरक्षणासाठी राष्ट्रीय शेअर बाजाराने युनिसेफच्या साह्याने पुढाकार घेतला आहे. त्या पार्श्वभूमीवर एनएसईने ३५ वंचित मुलांना दत्तक घेतले आहे. बालदिनी या मुलांनी राष्ट्रीय शेअर बाजारात मुख्य कार्यकारी विक्रम लिमये यांच्या उपस्थितीत घंटानाद करून बाजार समाप्तीची घोषणा केली.

**Prahar**




स्टॉक एक्स्चेंजचे व्यवस्थापकीय संचालक व सीईओ विक्रम लिमये यांच्या उपस्थितीत ३५ मुलांच्या समूहाने नॅशनल स्टॉक एक्सचेंज मध्ये क्लोजिंग बेल वाजवली.

**Divya Bhaskar**

## એનએસઈમાં ક્લોઝિંગ બેલ સેરિમનીમાં બાળકો




બાળ દિવસ નિમિત્તે એનએસઈના એમડી અને સીઈઓ વિક્રમ લિમયેએ બાળકો સાથે ક્લોઝિંગ બેલ સેરિમનીનું અનોખું આયોજન કર્યું હતું.

**Shivnar**

# बालहक्कांचे संरक्षण आणि त्याबाबत जागृती निर्माण करण्यासाठी एकत्रितपणे आवाज उठविण्यासाठी मुले नॅशनल स्टॉक एक्स्चेंज घेतले ताब्यात



मुंबई, शुक्रवार : जगातल्या सर्वात असुरक्षित मुलांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी आवाज उठविण्यासाठी बालदिनाच्या निमित्ताने ३५ मुलांच्या समूहाने आयकॉनिक नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ताब्यात घेतले. नाईनइजमाईन, आश्रमशाळा यासारख्या सेवाभावी संस्थांमधील मुले आणि कॅपजेमिनी टेक्नोलॉजी सर्व्हिस इंडिया लिमिटेडमधील सीएसआर अधिकारी कुमार अनुराग प्रताप आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंजचे व्यवस्थापकीय संचालक व सीईओ विक्रम लिमये हे प्रसिद्ध अग्रणी उद्योजक यांच्यात अत्यंत रोचक चर्चा झाली. या चर्चेत, उद्योग जगत मुलांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्याबाबत जागृती कशा प्रकारे निर्माण करू शकेल, याविषयी आत्मपरिक्षण करण्यात आले आणि याबाबतच्या कल्पना एकमेकांना सांगितल्या. या कार्यक्रमाचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे मुलांनी मान्यवरांच्या उपस्थितीत क्लोजिंग बेल वाजविली. त्याचप्रमाणे बालहक्क व शाश्वत विकास ध्येय आणि त्यांचे मुलांसाठी असलेले महत्त्व याविषयी मुलांनी सादरीकरण केले.

जागतिक बालदिनाच्या दिवशी यूएनमध्ये बालहक्कांचा ठराव पारित करण्यात आला होता. त्यामुळे या दिवसाला अत्यंत महत्त्व आहे. या औचित्याने युनिसेफ आपले भागीदार, प्रसारमाध्यमे, संसद प्रतिनिधी आणि उद्योगजगत यांच्यासमवेत काम करत आहे. मुलांचा जीव वाचविणे, त्यांच्या हक्कांसाठी लढा देणे आणि मुलांना आपल्या क्षमतेनुसार संधी प्राप्त करून देणे यासाठी युनिसेफतर्फे आठवडाभर उपक्रम राबविण्यात येणार असून त्यासाठी मुलांनीच आवाज उठवावा यासाठी आवाहन केले आहे. १४ ते २० नोव्हेंबर या कालावधीत #KidsTakeOver हा उपक्रम राबविण्यात येणार असून प्रसारमाध्यमे, राजकारण, उद्योगजगत, क्रीडाजगत, मनोरंजन जगत या क्षेत्रांमध्ये मुले महत्त्वाच्या भूमिका निभावणार आहेत. या निमित्ताने त्यांच्या पिढीला सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या समस्यांवर प्रकाश टाकण्यात येणार आहे. हा जगभरात मुलांसाठी मुलांकडून साजरा करण्यात येणारा दिवस असणार आहे.

या वेळी युनिसेफ इंडियाच्या प्रोग्रॅम विभागाच्या उपप्रतिनिधी ऑब्रिएट ऑरिएन म्हणाल्या, "एक सर्वात महत्त्वाचा बालहक्क म्हणजे त्यांना सहभागी होता येण्याचा हक्क. मुले या जगाचे भविष्य आहेतच, त्याचप्रमाणे आम्हाला जो बदल घडवायचा आहे त्याचाही एक प्रमुख भाग आहेत, असा आमचा विश्वास आहे. त्यांचा सर्वात जास्त प्रभाव पडत असतो. युनिसेफ म्हणून आम्ही जे काही करतो, त्यासाठी मुले आणि त्यांच्याशी निगडीत मुद्दे हा त्याचा पाया असतो.